



गुढी पाडवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!


दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र |गुरुवार, 19 मार्च 2026| |अंक क्र. 299|वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com


## रमाई घरकुल आवास योजनेच्या नवीन मंजूर दोनशे प्रस्तावांचा शुभारंभ आणि 546 दिव्यांगांना सहाय्यता निधीचे वितरण

# प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत परळीत गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर 677 घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता होणार प्रदान

## ना .पंकजाताई मुंडे व आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरण व शुभारंभ

पंतप्रधान आवास योजना 2.0

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत परळी शहरातील तब्बल 677 लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर होणार आहे. सर्वांसाठी निवारा हे उद्दिष्ट घेऊन प्रत्येकाच्या डोक्यावर हक्काचे छत असावे या दृष्टिकोनातून परळी नगर परिषदेच्या माध्यमातून 677 लाभार्थ्यांना ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत गुढीपाडव्याच्या दिवशी दि. 19 रोजी पहिला हप्ता वितरित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर रमाई घरकुल आवास योजनेच्या नवीन मंजूर दोनशे प्रस्तावांचा शुभारंभ आणि 546 दिव्यांगांना सहाय्यता निधीचे वितरण केले जाणार असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे.

परळी वैजनाथ शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जात असून केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्याचे वितरण करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत परळी वैजनाथ शहरातील ६७७ पात्र लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पाडव्याच्या शुभमुहूर्तावर देण्यात येणार आहेत. या निमित्ताने लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर परळी वैजनाथ येथे पाडव्याच्या दिवशी दि.१९ रोजी सकाळी ११.३० वाजता राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे धनादेश/अनुदान वितरित करण्यात येणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे आदीसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना 2.0 ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच निम्न व मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबांना सुरक्षित व पक्के घर उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य दिले जाते. पहिला हप्ता मिळाल्यानंतर घरबांधणीच्या कामांना गती मिळून लाभार्थ्यांना लवकरात लवकर स्वतःच्या घरात राहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर रमाई घरकुल आवास योजनेच्या नवीन मंजूर दोनशे प्रस्तावांचा शुभारंभ आणि 546 दिव्यांगांना सहाय्यता निधीचे वितरण केले जाणार आहे.

नगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने यासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित करण्यात आली आहे. निधीचे वितरण पारदर्शक आणि वेळेवर व्हावे यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. शहरातील झोपडपट्टीमुक्ती व "सर्वांसाठी निवारा" या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.अनेक वर्षांपासून स्वतःच्या घराच्या प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबांना या योजनेमुळे मोठा दिलासा मिळाला असून पहिल्या हप्त्याच्या वितरणानंतर परळी शहरात मोठ्या प्रमाणावर पक्क्या घरांच्या उभारणीला गती मिळणार आहे. त्याचबरोबर रमाई आवास योजनेच्या अंतर्गत उद्दिष्ट देण्यात आलेल्या 200 नवीन प्रस्तावांचा शुभारंभ होणार आहे. दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या सहाय्यता निधीचे वितरणही या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास मोठी संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण , बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, मुख्याधिकारी पी.एन. निगळ, उप मुख्याधिकारी संतोष रोडे, तसेच सर्व सभापती, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांनी केले आहे.

# वानटाकळी जिल्हा परिषद शाळेत एलईडी टिव्ही भेट

**परळी– प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील वानटाकळी या गावात समाजाभिमुख कार्याचा एक प्रेरणादायी उपक्रम पाहायला मिळाला आहे. समाजासाठी काहीतरी देणं लागते या भावनेतून कार्य करणाऱ्या दानशूर व्यक्तींमुळे आजही ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था उभारी घेताना दिसत आहेत.

मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक तसेच छत्रपती मराठा सेनेचे संस्थापक अध्यक्ष महेशभैया डोंगरे पाटील यांनी वानटाकळी येथील जिल्हा परिषद शाळेला एलईडी टीव्ही भेट देत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोलाची मदत केली आहे. सध्या अनेक जिल्हा परिषद शाळा बंद होण्याच्या मार्गावर असताना, अशा प्रकारची मदत या शाळांना नवसंजीवनी देणारी ठरत आहे.

गावातील सामाजिक कार्यात सदैव पुढाकार घेणारे अण्णासाहेब जाधव यांनी शाळेतील भौतिक सुविधांची कमतरता लक्षात घेतली. मुख्याध्यापकांसोबत झालेल्या चर्चेनंतर शाळेस एलईडी टीव्हीची गरज असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी तात्काळ महेशभैया डोंगरे पाटील यांच्याशी संपर्क साधून ही बाब मांडली.

महेशभैया डोंगरे पाटील यांनी कोणतीही औपचारिकता न ठेवता आणि विलंब न करता तत्काळ मदत पाठवून आपल्या समाजाभिमुख वृत्तीचा परिचय दिला. त्यांच्या या कृतीमुळे गावातील






विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण साधनांचा लाभ मिळणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल, तसेच डिजिटल माध्यमातून शिक्षण अधिक प्रभावी होईल, असा विश्वास अण्णासाहेब जाधव, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि मुख्याध्यापकांनी व्यक्त केला.

आजच्या काळात समाजासाठी झटणाऱ्या आणि नि:स्वार्थ भावनेने मदत करणाऱ्या व्यक्तींची गरज अधिक आहे. महेशभैया डोंगरे पाटील आणि त्यांच्या प्रेरणेने कार्य करणारे अण्णासाहेब जाधव यांसारख्या व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्थान ठरत असून, त्यांच्या कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# ॲट्रोसिटी कायद्याला धक्का लावण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही; सामाजिक न्याय मंत्र्यांच्या विधानाचा राम किरवले. यांच्याकडून तीव्र निषेध

**सिरसाळा/ अतुल बडे.**

ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत होणारी तातडीची अटक थांबवून आधी चौकशी करण्याचा निर्णय घेतल्याचे विधान सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत केले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील अनुसूचित जाती आणि जमातींचे सुरक्षा कवच धोक्यात आले असून, बहुजन कष्टकरी भीमसैनिकांच्या वतीने या निर्णयाचा तीव्र निषेध करत आहे. "ज्या घटनेमुळे शिरसाट आमदार आणि मंत्री झाले, त्याच घटनेने दिलेल्या अधिकारांना नख लावण्याचा प्रयत्न करू नका," सामाजिक कार्यकर्ते राम किरवले यांनी दिला आहे.

"दलितांवरील अत्याचारांना मोकळे रान देण्याचे कारस्थान"

या निर्णयावर भाष्य करताना राम किरवले.म्हणाले की, "ॲट्रोसिटी कायदा हा मागासवर्गीयांवरील अन्यायाविरुद्धचा सर्वात मोठा आधार आहे. तातडीच्या अटकेची तरतूद शिथिल करणे म्हणजे गुन्हेगारांचे धाडस वाढवणे होय. आधीच राज्यात दलितांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढत असताना, अशा प्रकारचे बदल करून सरकार नेमकं कोणाचे संरक्षण करू पाहत आहे? हा निर्णय म्हणजे दलित-बहुजन समाजाच्या पाठीत खंजीर खुपसण्यासारखे आहे."

## मुख्य आक्षेप आणि मागण्या:

- **सुरक्षेची भीती: अटकेची तरतूद काढल्यास आरोपी पीडित कुटुंबावर दबाव आणू शकतात आणि पुरावे नष्ट करू शकतात.**
- **विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा अपमान: संविधानाने दिलेल्या विशेष तरतुदींना 'गैरवापर' म्हणणे ही मानसिकता घातक आहे.**
- **२०१८ च्या जनआंदोलनाची आठवण: यापूर्वी जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने असा प्रयत्न केला होता, तेव्हा संपूर्ण देश पेटून उठला होता. सरकारने तो इतिहास विसरू नये.**

## तीव्र आंदोलनाचा इशारा:

राम किरवले.यांनी स्पष्ट केले आहे की, जर सरकारने हा लोकशाहीविरोधी निर्णय मागे घेतला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक कार्यकर्ते राम किरवले याच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. "आम्ही रस्त्यावर उतरून संघर्ष करू, पण आमच्या



हक्काच्या कायद्याचे महत्त्व कमी होऊ देणार नाही," असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

"संजय शिरसाट हे ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात, त्याच समाजाच्या अस्तित्वावर घाला घालण्याचे काम ते करत आहेत. सत्तेच्या उबेत त्यांनी महापुरुषांचे संघर्ष विसरू नयेत. ॲट्रोसिटी कायद्याला धक्का लावल्यास त्याचे गंभीर परिणाम सरकारला भोगावे लागतील."

- **"संविधानामुळे मंत्री झालात, हे विसरू नका!" - राम किरवले चा संजय शिरसाटांना थेट इशारा.**
- **ॲट्रोसिटी कायद्याशी खेळू नका! राज्यव्यापी आंदोलनाचा पवित्रा.**
- **दलितांच्या सुरक्षा कवचावर घाला! शिरसाटांच्या निर्णयाचा राम किरवले यांच्या कडून जाहीर निषेध.करण्यात आला. जय भीम जय संविधान.**

# परळीत २२ एप्रिल रोजी ब्राह्मण बहुद्देशीय सभेचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा!

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)–**

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने यावर्षी ४६ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा येत्या २२ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे.संपूर्ण महाराष्ट्रात नियोजनबध्द सोहळ्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात आपल्या मुलांचा उपनयनसंस्कार करण्यासाठी लवकरात लवकर नावनोंदणी करून घ्यावी असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या ४५ वर्षापासून ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने अविरतपणे हा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उपक्रम चालवला जातो.शानदार आयोजन,





नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. यावर्षीचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा बुधवार दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी वैद्यनाथ मंदिर दर्शन मंडप परळी वै. येथे सकाळी ८.५२ वा. संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी २१०० रु.नोंदणी शुल्क ठेवण्यात आले आहे.या सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात आपल्या उपनीत मुलांची नावनोंदणी करण्यासाठी अंतिम दिनांक १५ एप्रिल २०२६ आहे. नोंदणीसाठी बंडू महाराज टिंबे (दक्षिणमुखी गणेश मंदिर परळी वै.) मो.क्र. ८९७५२९२१११, सचिन जोशी (न्यू जोशी मेडिकल मोंढा परळी वै.) मो.क्र. ९९२२२६१७४०, शिरिष राजुरकर वैद्यनाथ मंदिर ७५०७०५२०५०, गिरीश प्रयाग (प्रयाग इलेक्ट्रिकल आय डी बी आय बँकेसमोर) ९०२८८१११७२, जयराम गोंडे (स्माईल फोटो स्टुडीओ) मो.क्र.९८२३१३७२९५, प्रमोद औटी, साई विठ्ठल मल्टिसर्व्हिसेस,राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक मो.क्र. ९०२८८१११७३, विश्वांभर देशमुख (व्यंकटेश जनरल स्टोअर्स) मो. ९६५७६५६९५१, प्रदीप अग्निहोत्री प्रसाद जनरल स्टोअर्स मो.क्र.९०२८९०४०९० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा, परळी वैजनाथ यांनी केले आहे.







# गुढी पाडवा : समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून सखोल अभ्यास



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात गुढी पाडवा हा सण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो; परंतु समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, हा सण केवळ धार्मिक किंवा पारंपरिक नसून तो समाजाच्या रचनेचे, मूल्यांचे आणि बदलत्या प्रवाहाचे प्रतिबिंब आहे. कोणताही सण हा समाजातील सामूहिक जीवनाचा आरसा असतो. गुढी पाडवा हा त्याचाच एक जिवंत आणि प्रभावी नमुना आहे, जो समाजातील एकात्मता, सांस्कृतिक सातत्य आणि परिवर्तन यांचा संगम दाखवतो.

समाजशास्त्राच्या दृष्टीने गुढी पाडवा हा सामूहिक ओळख (Collective Identity) निर्माण करणारा सण आहे. एका विशिष्ट दिवशी संपूर्ण समाज एकाच परंपरेचे पालन करतो, एकाच प्रतीकाचा—गुढीचा—स्वीकार करतो आणि नववर्षाचे स्वागत करतो. या प्रक्रियेमुळे "आपण एक आहोत" ही भावना बळकट होते. समाजशास्त्रज्ञ Émile Durkheim यांनी मांडलेल्या "collective consciousness" या संकल्पनेनुसार, समाजातील लोक एकत्र येऊन जेव्हा एकसमान कृती करतात, तेव्हा त्यांच्यात एक सामूहिक चेतना निर्माण होते. गुढी पाडवा हा त्या चेतनेला बळ देणारा सण आहे.

गुढी हे प्रतीक समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. गुढी ही केवळ धार्मिक वस्तू नसून ती एक सांस्कृतिक संकेत (cultural symbol) आहे. कडुनिंब, गाठी, रेशमी वस्त्र आणि कलश यांसारखे घटक जीवनातील विविध अनुभवांचे प्रतिनिधित्व करतात—कडू-गोड, सुख-दु:ख, संघर्ष आणि यश. या प्रतीकांद्वारे समाजातील मूल्ये पुढील पिढीकडे हस्तांतरित होतात. समाजशास्त्रात याला "cultural transmission" असे म्हटले जाते. या प्रक्रियेमुळे परंपरा जिवंत राहतात आणि समाजाचे सांस्कृतिक सातत्य टिकून राहते.

गुढी पाडवा हा सण समाजातील कौटुंबिक आणि सामाजिक संबंध दृढ करणारा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. या दिवशी कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येतात, पूजा करतात, सण साजरा करतात आणि एकमेकांशी संवाद साधतात. आधुनिक जीवनशैलीत वाढलेल्या व्यस्ततेमुळे कुटुंबातील संवाद कमी होत चालला आहे; अशा परिस्थितीत हा सण एकत्र येण्याची आणि नातेसंबंध मजबूत करण्याची संधी देतो. शेजारी, मित्र आणि नातेवाईक यांच्यातील भेटीगाठी समाजातील सामाजिक भांडवल (social capital) वाढवतात.

याशिवाय, गुढी पाडवा हा सण सामाजिक एकात्मता (social cohesion) निर्माण करतो. विविध आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्तरांतील लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. सणाच्या माध्यमातून समाजातील भिन्न घटकांमध्ये एकसंधता निर्माण होते. समाजशास्त्रज्ञांच्या मते, अशा सणांमुळे समाजातील तणाव कमी होतो आणि सामाजिक संतुलन टिकून राहते.

आधुनिक काळात गुढी पाडव्याच्या स्वरूपात झालेले बदल समाजशास्त्रीय दृष्टीने महत्त्वाचे आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण यामुळे जीवनशैलीत मोठे बदल झाले आहेत. फ्लॅट संस्कृती, जागेची कमतरता आणि सुरक्षिततेचे प्रश्न यामुळे गुढी उभारण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. अनेक कुटुंबे आता घराच्या आत गुढी उभारतात किंवा लहान स्वरूपातील गुढी तयार करतात. हा बदल समाजशास्त्रातील "social change" या संकल्पनेशी संबंधित आहे. परंपरा नष्ट होत नाहीत, तर त्या काळानुसार रूपांतरित होतात. यालाच "continuity and change" असे म्हटले जाते.

गुढी पाडवा हा सण समाजातील लिंगभेद आणि भूमिकांवर (gender roles) देखील प्रकाश टाकतो. पारंपरिक पद्धतीत महिलांचा सणाच्या तयारीत मोठा सहभाग असतो—घराची स्वच्छता, सजावट, रांगोळी आणि पूजनाची तयारी. पुरुष गुढी उभारणे किंवा इतर व्यवस्थापनाची कामे करतात. मात्र, आधुनिक समाजात या भूमिकांमध्ये बदल होताना दिसतो. पुरुष आणि महिला दोघेही सणाच्या सर्व कामांमध्ये सहभागी होत आहेत, जे लिंगसमतेच्या दिशेने होत असलेल्या बदलाचे संकेत आहेत.

गुढी पाडवा हा सण परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील समतोल साधणारा आहे. एका बाजूला धार्मिक श्रद्धा, पौराणिक कथा आणि पारंपरिक मूल्ये आहेत, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक जीवनशैली, वैज्ञानिक विचार आणि बदलत्या सामाजिक गरजा आहेत. हा सण या दोन्ही घटकांना एकत्र आणतो. त्यामुळे गुढी पाडवा हा केवळ भूतकाळाशी जोडलेला नाही, तर वर्तमान आणि भविष्याशीही निगडित आहे.

याशिवाय, गुढी पाडवा हा सण सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करतो. जागतिकीकरणाच्या युगात स्थानिक संस्कृतीवर बाह्य प्रभाव वाढत आहेत. अशा परिस्थितीत गुढी पाडवा सारखे सण स्थानिक परंपरा आणि संस्कृती टिकवून ठेवण्यास मदत करतात. विशेषतः महाराष्ट्राच्या ओळखीचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

गुढी पाडवा हा सण समाजातील मानसिक आरोग्य आणि सकारात्मकतेशी देखील संबंधित आहे. नववर्षाची सुरुवात, नवीन आशा, सकारात्मक विचार आणि आनंदी वातावरण यामुळे व्यक्तीच्या मानसिक स्थितीवर सकारात्मक परिणाम होतो. समाजशास्त्राच्या दृष्टीने, अशा सणांमुळे व्यक्तीला समाजाशी जोडलेपणाची भावना मिळते, जी मानसिक स्थैर्यासाठी आवश्यक असते.

शेवटी असे म्हणता येईल की, गुढी पाडवा हा सण केवळ धार्मिक परंपरा नसून तो समाजाच्या रचनेचा, मूल्यांचा आणि परिवर्तनाचा आरसा आहे. तो सामूहिक चेतना निर्माण करतो, सामाजिक एकात्मता वाढवतो, सांस्कृतिक सातत्य टिकवतो आणि आधुनिकतेशी जुळवून घेत समाजाला पुढे नेतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, गुढी पाडवा हा परंपरा आणि परिवर्तन यांचा सुंदर संगम आहे, जो समाजाच्या जिवंतपणाचे आणि गतिशीलतेचे प्रतीक आहे.

**डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

# शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वत :चे करिअर घडवता येते - सौ . मिनाक्षी भोसले



**प्रतिनिधी | सोपान पगारे**

(गहिनीनाथ पाचबैल) महिलांचे शिक्षण हे वैयक्तिक प्रगतीसाठी नाही तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या हितासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून शिक्षणामुळे महिला आत्मनिर्भर आणि आत्मविश्वासपूर्ण बनतात गरीबी कमी होते आरोग्य सुधारते आणि महिला शिक्षणामुळे ज्ञानाबरोबरच सुसंस्कृत पिढी निर्माण होते त्यामुळे समाज आणि महिलांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून घेऊन महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून करीअर घडवण्याचे आवाहन सौ. मिनाक्षी भोसले मॅडम यांनी केले.

आष्टी तालुक्यातील पिंप्री, रूटी, भोसले वस्ती ग्रामपंचायत अंतर्गत रुटी, भोसले वस्ती पोलीस पाटील पदाची नुकतीच निवड झाली असून येथील शेतकरी कुटुंबातील सौ. रेश्मा विठ्ठल सुळे ह्या येथील पोलीस पाटील पदी नियुक्त झाल्या असुन मंगळवार दिनांक १७/३ /२०२६ त्यांच्या निवडीबद्दल आदर्श शेतकरी तथा शिक्षक राजेंद्र भोसले सर, सौ. मिनाक्षी भोसले मॅडम व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाला विठ्ठल जनार्धन सुळे जनार्धन सुळे, डॉ. भागवत सुळे, सौ.लिलाबाई सुळे, सौ. सारीका सुळे आदी मान्यवर उपस्थित यावेळी कार्यक्रमाला संबोधीत करताना सौ. मिनाक्षी भोसले मॅडम म्हणाल्या की, आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. महिलांना प्रत्येक क्षेत्रात आरक्षण असुन गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्राच्या जडणघडणीत महिलांचे मोठे योगदान असून महिलांनी चुल आणि मुल ही जुनी परंपरा मोडीत काढली आहे परंतू आजही समाजातील काही मंडळी स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला नाही त्यामुळे त्या परिवाराच्या आर्थिक, आरोग्यदायी, शैक्षणिक आणि सुसंस्कृत पिढी घडवण्यात अपयशी ठरत असुन त्याविरुद्ध ज्या घरात महिला शिक्षित आहे तेथील घरात सुसंस्कृत पिढी घडताना पहायला मिळत आहे. तसेच येथील विठ्ठल जनार्धन सुळे यांना व त्यांच्या परिवाराने सौ. रेश्मा सुळे यांच्यावर विश्वास दाखवून शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचे करीअर घडवण्याचे काम केले असून त्यांची पुढील पिढी नक्कीच आरोग्यदायी, ऐश्वर्य संपन्न व सुसंस्कृत घडवण्यासाठी फायदा होणार असल्याचे मत व्यक्त केले.तसेच शिक्षणाला वयाची अट नसुन शिक्षणाच्या माध्यमातून कधीही जिवनात बदल घडवू शकतो कारण प्रचंड जिद्द आणि परिश्रम केले तर यश हे नक्कीच मिळत असतं ह्याच उदाहरण म्हणजे रेश्मा सुळे या आहेत लग्न होऊनही परिवाराचा घाडा सांभाळत त्यांनी ते शक्य करून दाखवलं आहे.

### ■ परिवाराने दाखवलेल्या विश्वासामुळे यश संपादन केले - सौ. रेश्मा विठ्ठल सुळे

महिला शिक्षणामुळे आज सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात काम करत आहे परंतू त्यासाठी त्या परिवारातील सदस्यांनी त्या स्त्री वर ठेवलेला विश्वास महत्वाचा असतो कारण परिवाराची साथ आणि शाबासकीची थाप मिळाली तर कोणतीही महिला कुठेही न डगमगता जे अशक्य वाटते ते शक्य करू शकते ते माझ्या बाबतीत घडले असून माझ्या आई, वडील, सासु सासरे व परीसरातील सदस्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे हे यश संपादन केले आहे.

# बीड जिल्ह्यातील पहिली जनावरांची पाणपोई – देऊळगाव घाट येथे सुरू

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड हे गाव गर्भागिरी पर्वताच्या पायथ्याशी वसलेले आहे. या गावाला थोर संतांची परंपरा लाभलेली आहे. देऊळगाव घाट या गावातील मोगदरा या ठिकाणी बीड जिल्ह्यातील पहिली जनावरांची पाणपोई हरी ओम फुट्स कंपनी मुंबई यांच्यातर्फे चालू करण्यात आली आहे.


बीड जिल्ह्यातील उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना माणसांसोबतच मुक्या जनावरांनाही पाण्याची मोठी गरज भासत आहे. अशा कठीण काळात देऊळगाव घाट येथे "हरी ओम फुड्स कंपनी मुंबई यांच्या तर्फे जनावरांसाठी पहिली पाणपोई बाबासाहेब आसाराम ठोंबरे यांच्या माध्यमातून सुरू करण्यात आली असून, हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. दिवसाला शंभर ते दीडशे गाई गुरे पानपोही वरती पाणी पिण्यासाठी जात आहेत. उन्हाळ्यात रस्त्याने फिरणारी जनावरे, गुरेढोरे, पक्षी आणि इतर मुक्या जीवांना पाण्याअभावी त्रास सहन करावा लागतो. ही गरज ओळखून "हरी ओम फुड्स" संस्थेने देऊळगाव घाट येथे जनावरांसाठी स्वच्छ आणि सतत पाणी उपलब्ध करून देणारी पाणपोई उभारली आहे.या उपक्रमामुळे परिसरातील जनावरांना मोठा दिलासा मिळत असून ग्रामस्थांकडूनही या कामाचे कौतुक केले जात आहे.समाजामध्ये दया, करुणा आणि पर्यावरण संवर्धनाची भावना जपणारा हा उपक्रम खरोखरच अनुकरणीय आहे."मुक्या जीवांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा" या भावनेतून सुरू झालेली ही पाणपोई बीड जिल्ह्यातील एक आदर्श सामाजिक उपक्रम ठरत आहे. अशा प्रकारचे उपक्रम इतर गावांनीही पुढे येऊन राबवावेत, हीच अपेक्षा. हरी ओम फुड्स तर्फे सुरू झालेला हा उपक्रम मानवतेला सुंदर संदेश देणारा आहे.



# गुढीपाडवा पट वाढवा, सांगली जिल्हा परिषदेची विशेष मोहीम ; पाडव्याच्या मुहूर्तावर बालचमुंची पावले पडणार शाळेच्या अंगणात !

सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांगली जिल्हा परिपदेचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांच्या परफेक्ट नियोजनातून सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता पहिलीच्या वर्गात जास्तीत जास्त विद्यार्थी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दाखल व्हावेत आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचा पट वाढावा, यासाठी गुढीपाडवा...पट वाढ़वा ही विशेष मोहीम संपूर्ण सांगली जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. विद्यार्थी पहिलीत दाखल करून घेण्यासाठी गुढी पाडव्यादिवशी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद

शाळा सुरू राहणार आहेत.





गेली चार पाच वर्षे जिल्हा परिपदेच्या शाळांमध्ये इयत्ता

पहिलीच्या वर्गात विद्यार्थी संख्या वाढावी, पटनोंदणी सर्वेतील जास्तीत जास्त विद्यार्थी जिल्हा परिपदेच्या शाळेत दाखल व्हावेत यासाठी या अभियानाच्या माध्यमातून वाडी, वस्तीवरील पालकांच्या पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न संपूर्ण सांगली जिल्ह्यात होत आहे. आणि गेल्या चार-पाच वर्षांची आकडेवारी पाहिली तर दरवर्षी जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिलीसह सर्व वर्गात पट वाढताना दिसत आहे. अनेक विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून परत जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखल होताना दिसत आहेत. हेच या मोहिमेचे यश आहे.

सांगली जिल्ह्याला आणि

जिल्हा परिपदेलाही मोठा इतिहास आहे. अनेक उपक्रम सांगली जिल्ह्याने राज्याला यापूर्वीही दिले आहेत. मॉडेल स्कूल ही सांगली जिल्ह्यातील लोक चळवळ ! माजी मंत्री आमदार जयंत पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डुडी त्यानंतर श्रीमती तृप्ती धोडमिसे आणि प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांच्या माध्यमातून मॉडेल स्कूल ही संकल्पना जिल्ह्यात राबवली गेली. पालक आणि समाजाचा उस्फुर्त सहभाग मिळाला. आणि या माध्यमातून जिल्हा परिपदेच्या शाळांना पुन्हा उर्जित अवस्था आणण्याचे क्रांतिकारी काम उभे राहिले. पुन्हा एकदा जिल्हा परिपदेच्या शाळा बहरू लागल्या. विद्यार्थीरुपी पाखरांची किलबिलाट जिल्हा परिषदेच्या शाळांच्या आवारात पुन्हा होऊ लागली. यामध्ये लोकसहभागातून आणि शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा उठाव झाला. जिल्ह्यातील शेकडो शाळा भौतिक सुविधांनी समृद्ध झाल्या. त्यामुळे आपोआपच पालकांची आणि बालकांचीही पावले जिल्हा परिषदेच्या शाळेकडे वळू लागली.

जिल्हा परिषद शाळांमध्ये सातत्याने विविध उपक्रम राबवायला सुरुवात झाली आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आलेखही उंचावू लागला आहे. सांगली जिल्ह्यातील मॉडेल स्कूलच्या कामाची दखल राज्य शासनाने घेतली आणि हा उपक्रम संपूर्ण राज्यासाठी लागू केला . सांगली जिल्ह्याच्या दृष्टीने ही भुषणावह बाब आहे. गुणवत्ता वाढीसाठी सांगली जिल्हा परिषदेने इयत्ता चौथी आणि सातवीच्या वर्गासाठी डॉ.पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी बरोबरच इतर सर्व वर्गांसाठी गुणवत्ता चाचणी परीक्षा दरवर्षी घेतल्या जात आहेत. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी फेब्रुवारी महिन्यात घरोघरी जाऊन इयत्ता पहिलीतील दाखल पात्र विद्यार्थ्यांचा सर्वे केला आहे. १००% विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील आहेत. सर्वेतील शंभर टक्के विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळेतच दाखल व्हावेत यासाठी जिल्ह्यातील सर्व शिक्षक प्रयत्नशील आहेत.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर जिल्ह्यातील पालकांना इयत्ता पहिलीतील आपला विद्यार्थी जिल्हा परिपदेच्या शाळेतच दाखल करावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीनेही करण्यात आलेआहे. या आवाहनात शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविच उपक्रमांचा उल्लेख केला आहे. पालकांच्याकडून कोणतीही फी न घेता राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्नही ताकदीने केला जात आहे. तसेच मोफत व शिक्षणाच्या अधिकार अधिनियम २००९ व प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णयान्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांना जिल्हा परिषद शाळेत दाखल करा असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आल्या आहे. याबरोबर जिल्हा, तालुकास्तरावर कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांनी मी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेतले असून आपणही जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आपला विद्यार्थी दाखल करावा असे आवाहन या निमित्ताने केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)







# मान्यवर कांशीराम साहेबांनी "फुले-शाहू-आंबेडकरी आंदोलनाला त्याच्या तार्किक गंतव्यापर्यंत पोहोचवणे" हाच स्वतः च्या जिवनाचा उद्देश निर्धारीत करून, संपूर्ण जिवन त्यासाठी समर्पित केले - डॉ. शशिकांत पट्टेकर

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधीः**

मान्यवर कांशीराम साहेबांनी आपल्या जिवनाचा उद्देश "फुले-शाहू-आंबेडकरी आंदोलनाला त्याच्या तार्किक गंतव्यापर्यंत पोहोचवणे" हा निर्धारीत केला आणि त्या निर्धारीत उद्देशाची पुर्तता करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण जिवन समर्पित केले, असे प्रतिपादन डॉ. शशिकांत पट्टेकर (संयोजक, SFROS) यांनी केले.

मान्यवर कांशीराम साहेबांच्या जयंतीनिमित्त महिनाभर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांच्या मालिकेअंतर्गत "स्टुडंट्स फॉर रीकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी" (SFROS) ने रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे "विशेष साप्ताहिक अभ्यास वर्गाचे" आयोजन केले होते. या अभ्यास वर्गाचा विषय "मान्यवर कांशीराम साहेबांकडून आपण काय शिकावे?" असा होता.

या विशेष साप्ताहिक अभ्यास वर्गाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवलिंगप्पा किन्नूर उपस्थित होते; तर अभ्यास वर्गाचे संबोधक म्हणून डॉ. शशिकांत पट्टेकर (संयोजक, SFROS) यांनी अभ्यास वर्गाच्या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजपरिवर्तनासाठी व "मैत्री वर आधारीत सामाजिक पुनर्निर्मानासाठी" कार्य करणाऱ्या महामानवांना अभिवादन करण्यात आले. उद्घाटक प्रकाश थोरात आणि प्रमुख अतिथी शिवलिंगप्पा किन्नूर यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित "जातीचा विध्वंस" आणि डॉ. सी. पी. थोरात लिखित "कांशीरामः मनुवाद्यां पुढील आव्हान" ही पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.

प्रकाश थोरात यांनी आपल्या उद्घाटनपर मनोगतात मान्यवर कांशीराम साहेबांच्या सामाजिक-राजकीय जीवनातील काही महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख केला. प्रमुख अतिथी शिवलिंगप्पा किन्नूर यांनी सांगितले की, कांशीराम साहेबांनी ज्यासाठी संघर्ष केला, ते "फुले-शाहू-आंबेडकरी आंदोलनाला त्याच्या तार्किक गंतव्यापर्यंत पोहोचविण्याचे व्यापक मिशन" होते.

मुख्य संबोधनात डॉ. शशिकांत पट्टेकर यांनी मान्यवर कांशीराम साहेबांच्या कार्याचे विश्लेषण करताना सांगितले की, ब्राह्मणी धर्माने निच घोषित केलेल्या सर्व शुद्रां-अति शुद्रांना (अर्थात शोषित आणि दलितांना) त्यांच्यातील अ-राजकीय मुळांना मजबूत करण्यासाठी, सफलतापूर्वक संघर्ष करण्यासाठी, सफल राजकारण करण्यासाठी आणि शासनकर्ती जमात बनवण्यासाठी संघटित करणे; हे त्यांचे मुख्य जिवनकार्य राहिले. हे सर्व कार्य "मैत्री सिद्धांता वर आधारीत समाजाचे पुनर्निर्मान" करण्याच्या "फुले-शाहू-आंबेडकरी आंदोलनाच्या तार्कीक गंतव्या" पर्यंत जाण्यासाठी होते, जेणेकरून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला स्थायीपण देता येईल.

फुले-शाहू-आंबेडकरी आंदोलनाचे तार्किक गंतव्य म्हणजे "मेत्ता (मित्रत्व) या सिद्धांतावर आधारित समाजाचे पुनर्निर्मान" असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. शशिकांत पट्टेकर यांनी पुढे सांगितले की, "मैत्री सिद्धांता वर आधारीत समाजाचे पुनर्निर्मान" करण्यासाठी राजकीय सत्तेचा उपयोग करण्याच्या ज्या संघटित पद्धतीने त्यांनी मार्गक्रमण केले, ती मुळतः सम्राट अशोकांनी प्राचिन कालखंडात अवलंबिलेली सफल पद्धती होती. म्हणून, याच संदर्भात ते "माझ्या स्वप्नातील भारत हा सम्राट अशोकाचा भारत आहे", असे वारंवार प्रतिपादित करायचे.

मुख्य संबोधणानंतर प्रश्नोत्तरांचे सत्रही घेण्यात आले. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुनील वाकेकर यांनी "स्टुडंट्स फॉर रीकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी" (SFROS) ला रु. ५०,०००/- ची सामाजिक सहयोग निधी दिली. या विशेष साप्ताहिक अभ्यास वर्गाचे सुत्रसंचलन उद्धव चौधरी यांनी केले, तर डॉ. वैशाली रामटेके यांनी आभार प्रदर्शन केले.



# लातूर जिपच्या अध्यक्षा उषाताई पाटील यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिनंदन

**लातूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. उषाताई संभाजी पाटील तळेगावकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी आगामी पाच वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी आणि सर्वांगीण विकासाची गंगा घराघरांत पोहोचवण्यासाठी अनमोल सूचना केल्या.

मुंबई येथील या सदिच्छा भेटीप्रसंगी पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, अरविंद पाटील निलंगेकर, जिपचे गटनेते रामचंद्र तिरुके, संभाजी पाटील तळेगावकर, नगरसेवक शहाजी पाटील तळेगावकर, भरत चामले आणि कु. भक्ती तळेगावकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मुलींची शासकीय निवासी शाळा येथे माजी विद्यार्थी मेळावा व इ.१० वी शुभेच्छा समारंभ उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी | सोपान पगारे**

श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील मुलींची शासकीय शाळा या शाळेमध्ये माजी विद्यार्थी व इयत्ता दहावी मधील विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती. शोभा कांबळे श्रीमती. योगिता जाधव (अधिक्षका, अति. कार्यभार) यांनी केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष .श्री. प्रविण कोरगंटीवार साहेब (सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, अहिल्यानगर)हे होते. व प्रमुख उपस्थिती म्हणून मा. श्रीमती. मंगल रूकेश सावंत (उप कृषी अधिकारी, पुणे) मा. सानिका श्रीकांत कुलांगे (मानसोपचार तज्ञ, समुपदेशक, अहिल्यानगर) बुधवार दि. १८/३/२०२६ रोजी दु.२ ते ५ वाजता.हे उपस्थित होते. दहावीच्या विद्यार्थिनींचा शुभेच्छा समारंभ व माजी विद्यार्थीणी यांचा सलमान सोहळा अतिशय आनंदात पार पडला यावेळी, माजी विद्यार्थिनींनी, या शाळेमध्ये शिकलेला अनुभव सांगितला, व बोलताना सांगितले की शाळा खूप, या शाळेत शिकल्यानंतर कधीच कोठे कमी पडत नाही, व शाळेतील जुन्या आठवणी सांगितल्या, शेवटी शेळके सर यांनी सर्वांच्या आभार मानले.



# भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था, मुंबई आयोजित "कर्तृत्ववान महिला सन्मान" कार्यक्रम उत्साहात संपन्न

**मुंबई(पी. डी. पाटील ):**

शनिवार दिनांक १४ मार्च रोजी दादर (प) येथील गुरुकुल सभागृहामध्ये जागतिक महिला दिन सप्ताहाचे औचित्य साधून, ध्येयवादी महिलांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने कृषी, आरोग्य, साहित्य, शिक्षण, कला आणि अध्यात्म यांसारख्या विविध क्षेत्रांत स्व कर्तृत्वाच्या जोरावर आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महाराष्ट्रातील रणरागिणींचा शोध घेऊन त्यांना या सोहळ्यात 'राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून ' सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षणातज्ज्ञ व साहित्यिक डॉ.लक्ष्मण माधवराव शिवणेकर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षिका सौ.वसुंधरा शिवणेकर, ज्येष्ठ वैदिक वास्तु तसेच डाऊझिंग प्रशिक्षक, संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.आनंदसर , ज्येष्ठ कृषी अभ्यासक श्री प्रकाश वसंत पेडणेकर, ओरा अभ्यासक डॉ. चंद्रमोहन विष्णू रानडे हे या प्रसंगी उपस्थित होते.

'भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था, ही मुंबईत गेली चोवीस वर्षे प्राचीन वैदिक विज्ञान विविध शास्त्रे विद्या कला वास्तुशास्त्र डाऊझिंग, वैकल्पिक वैद्यकीय संशोधन इत्यादी क्षेत्रात कार्य करते.

स्त्री शक्तीचा सन्मान आणि त्यांच्या कार्याला वैचारिक वैदिक सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त करून देत असताना वेदकालीन विदुषी स्त्रियांचे दिव्य स्मरण व्हावे, हा या पुरस्कारांच्या मुळाशी विचार असल्याने अदिती धरित्री संवर्धन, लोपामुद्रा, अन्नपूर्णा रससिद्धी, मैत्रेयी प्रज्ञा सन्मान, ब्रह्मवादिनी गार्गी, वाक अंभरुनी, अध्यात्म गौरव अशा समर्पक नावांच्या पुरस्काराची योजना आहे. "वर्तमान काळात हाडांची काडं आणि रक्ताचं पाणी करून आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खस्ता खाते ती आई असते " असे शिक्षणतज्ज्ञ डॉ. शिवणेकर श्रोत्यांना संबोधीत करताना म्हणाले." स्त्री संघर्षातून मार्ग काढून यशस्वी होऊ शकते हे सिद्ध केल्याचे सांगून वसुंधरा शिवणेकर यांनी शुभेच्छा दिल्या. सन 2026 वर्षातील पुरस्कार प्राप्त सन्माननीय महिलांमध्ये सौ. अनुसया वसंत कदम, साताराः 'कृषी गोसेवा " अदिती धरित्री संवर्धन पुरस्कार" ; सौ. मंदा लहू पवार,पुणेः 'लोपामुद्रा आरोग्य साधना राष्ट्रीय पुरस्कार' ; डॉ. सौ. उज्वला म्हात्रे, नवी मुंबईः 'लोपामुद्रा आरोग्य साधना राष्ट्रीय पुरस्कार' ; डॉ. पूनम द. पतंगे, पनवेलः 'लोपामुद्रा आरोग्य राष्ट्रीय पुरस्कार' ; सौ. शोभना कानस्कर, नवी मुंबईः "अन्नपूर्णा



रससिद्धी राष्ट्रीय पुरस्कार" ; सौ. रंजना राजेंद्र शिंदे, मुंबईः साहित्यासाठी "मैत्रेयी प्रज्ञा राष्ट्रीय पुरस्कार" ; सौ. कन्या सचिन आढाव, पुणेः शिक्षण व कला क्षेत्र "ब्रह्मवादिनी गार्गी राष्ट्रीय पुरस्कार" ; सौ.नीता निशिकांत पाटील, सांगलीः "ब्रह्मवादिनी गार्गी राष्ट्रीय पुरस्कार" ; सौ.चारू वाखारकर,पुणे ; "ब्रह्मवादिनी गार्गी राष्ट्रीय पुरस्कार ; सौ सविता अमर,मुंबई ; योगशास्त्र : "वाक अंभरुनी अध्यात्म गौरव राष्ट्रीय पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

या सर्व सन्माननीय महिलांना संस्थेचे सुवर्णपदक, सन्मान चिन्ह, मानपत्र आणि संस्थेतर्फे निर्मित वनस्पतीजन्य आरोग्य उत्पादन भेट वस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, मान्यवर व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सौ.सुनंदा माने, पुणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# गुढीपाडव्यानिमित्त श्री शंभू महादेव वाघाच्या काठी व कावडीची परळीत आज मिरवणूक सोहळा

## भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- स्वामी मठपती परिवाराचे आवाहन



परळी वैजनाथ /प्रतिनिधी

पंचम स्वयंभू ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथांच्या पुण्यभूमी असलेल्या परळी नगरीत गुढीपाडव्याच्या पावन दिवशी परंपरेनुसार 119 वर्षांची परंपरा असलेल्या श्री शंभू महादेवाच्या वाघाच्या काठी व कावडीचा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार असल्याची माहिती परळी चे मठपती स्वामी परिवाराने दिली आहे.

यंदाचा श्री शंभू महादेवाची काठी व कावड हा पवित्र उत्सव दयानंद स्वामी मठपती, जंगम गल्ली यांच्या निवासस्थानी साजरा होणार आहे.

विधीवत स्थापना - दिनांक 19 मार्च 2026 रोजी सकाळी 10 वाजता, वाघाच्या काठीची व कावडीची स्थापना होईल. महाआरती - सायंकाळी 5 वाजता, भक्तिमय वातावरणात भव्य महाआरती होईल. सवाद्य मिरवणूक - त्यानंतर वाघाची काठी व कावडीची भव्य मिरवणूक मठपती निवास जंगम गल्ली परळी वैजनाथ येथून हलगी-ताशांच्या गजरात निघेल.

यंदा 21 फूट उंच वाघाची काठी परंपरेनुसार तळहातावर खेळवत, भक्तिभावाने नगरपरिक्रमा करेल. सायंकाळी 5 वाजता ही भव्य मिरवणूक जंगम गल्ली येथून निघेल. नांदूर वेस, आंबेवेस, पेठ गल्ली, देशमुख पार मार्गे माजी आमदार कै. लक्ष्मणराव देशमुख यांच्या गढीच्या वाड्यात पोहोचेल. तेथे काठी व कावडी अकरा दिवसांसाठी विराजमान होईल, आणि या काळात भाविकांना दर्शन व पूजनाचा लाभ घेता येईल.

या धार्मीक कार्यक्रमाचा परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन समस्त मठपती परिवार यांनी केले आहे.

# किसान सभेकडून दावत-ए-इफ्तार संपन्न



परळी / प्रतिनिधी

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पवित्र रमजान महिन्याच्या निमिताने सामाजिक सलोखा अबादित रहावा व सामाजिक एकजूट कायम टिकून राहवी या उद्देशाने रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजन मंगळवार दि 17 रोजी करण्यात आले होते.या ईफ्तार पार्टीस किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ. ऑड.अजय बुरांडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

रमजानचा महिना हा संयम, भक्ती आणि त्यागाचे प्रतीक असून समाजात एकात्मता, बंधुता आणि सौहार्द निर्माण व्हावे या उद्देशाने अखिल भारतीय किसान सभा बीड कडून तालुक्यातील सिरसाळा येथे दावत-ए-इफ्तार चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सिरसाळा गावचे तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष अय्यासोदीन इनामदार यांच्या हस्ते धार्मिक परंपरेनुसार किसान सभेचे कॉ.ऑड.अजय बुरांडे यांचा सन्मान करण्यात आला. या इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सामाजिक कार्यकर्ते शेख नसीब यांनी केले. या प्रसंगी कॉ.बालाजी कडबाणे,कॉ.खय्युम शेख सिरसाळा पोलीस स्टेशनचे एपीआय दहिफळे यांच्यासह सिरसाळा गावातील असंख्य मुस्लीम बांधवानी या ईफ्तार पार्टीस उपस्थित राहून सामाजिक सलोखा व आपसी भाईचारा वाढावा या अनुशंगाने हजेरी लावून इफ्तार पार्टीचा आनंद घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉ. मदन वाघमारे कॉ.प्रकाश उजगरे,कॉ. महादेव शेरकर, कॉ.मोइदीन शेख,कॉ.वाजेद पठाण, कॉ.मदन राठोड,कॉ.अहेमद शेख,कॉ.नजीर बागवान, कॉ.इस्माईल शेख, कॉ.अप्पा तरकसे, कॉ.विशाल देशमुख, कॉ. प्रशांत मस्के,कॉ. सिद्राम सोळंके,विलास उजगरे इत्यादीनी मेहनत घेतली.

## परळी मतदारसंघात मुख्यमंत्री बळीराजा शेती / पांदण रस्ते योजनेच्या समितीवर निवड झाल्याबद्दल


# सिरसाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीच्या वतीने बाबासाहेब अण्णा काळे यांचा सत्कार

सिरसाळा- अतुल बडे

अशोक सम्राट बुद्ध विहार सिरसाळा या ठिकाणी परळी वैजनाथ मतदारसंघात मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते या योजनेतुन प्रस्तावित कामाचा आज संबंधित विभागाचे अधिकारी व अधिकाऱ्यासह आढावा घेन्यात आला यामध्ये सदस्य पदी सिरसाळा यथील परळी मार्केट कमिटीचे माजी सभापती बाबासाहेब अण्णा काळे. यांची मुख्यमंत्री बळीराजा रस्ते या योजनेच्या समितीवर सदस्य पदी निवड करण्यात आली. या निवडीचे सर्वस्व स्तरावर अभिनंदन करीत आहेत परळी मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब. यांनी बाबासाहेब अण्णा काळे. यांच्यावर विश्वास टाकून मोठी जबाबदारी दिली आहे. आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी दिलेल्या जबाबदारीचे सोनं केल्याशिवाय गप्प बसणार नाही अशा विश्वास व शब्द दिला आहे. व मतदार संघातील सर्व शेतकरी बांधवांना पांदण रस्ते विषयी माहिती देऊन त्यांचे शेतात जाणारे पांदण रस्ते करून देण्याचे आश्वासन काळे यांनी दिले आहे परळी येथे या ठिकाण विश्राम गृहपरळी येथे निवड करण्यात आली.

मतदारसंघात मनरेगा व जिल्हा नियोजन समिती संयुक्त माध्यमातून आगामी वर्षात शेत पादण रस्त्याचे उद्दिष्ट ठरवणे त्या अनुषंगाने निधीची मागणी करणे. प्रस्तावित रस्त्याच्या कामातील अतिक्रमणा सह विविध अडचणी दूर करणे व विविध विषयावर या चर्चा करून आवश्यक सूचना केल्या.

मतदार संघातील प्रत्येक गावातील सरपंच व प्रतिनिधीच्या सूचनांचा सकारात्मक विचार करून अंदाजपत्रे तयार करण्याच्या सूचनेसह आवश्यक तिथे मी स्वतः मदतीसाठी उपलब्ध राहील. असा शब्द दिला.



यावेळी उपस्थित सिरसाळा. मा. सरपंच राम दादा किरवले.सरपंच फिरोज पठाण. अच्युत बाप्पा किरवले. ग्रामपंचायत सदस्य संतोष किरवले. जयंती कमिटी अध्यक्ष अमोल भैया किरवले. अशोक गावडे. संभाजी आरसुळे. खंडू लगस्कर. पांडुरंग काळे.धनगर. समाजाचे नेते गोरख दादा काळे. दैनिक आरंभ परळी तालुका प्रतिनिधी बापू किरवले.दै. अतुल्य महाराष्ट्र प्रतिनिधी अतुल बडे सह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटी यांच्यासह उपस्थित होते.

मुख्यमंत्री बळीराजा पादण रस्ते योजना समितीवर परळी मतदारसंघातील पाच सदस्याची निवड करण्यात आली व त्या समितीवर परळी मतदारसंघाचे माजी कृषीमंत्री आमदार धनंजय मुंडे. साहेब हे अध्यक्षस्थानी आहेत व आज दि. 15 रोजी या समितीवर निवड केलेले परळी मार्केट कमिटीचे माजी सभापती. सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन. बाबासाहेब अण्णा काळे. शरद राडकर अमर गीते. विनायक राठोड.आबासाहेब पांडे. बंडू गीते. यांची निवड करण्यात आली आहे. सदरील समितीच्या अध्यक्षपदी माजी मंत्री परळीचे भावी विधाते आमदार धनंजय मुंडे साहेब. आहेत. या विषयांमध्ये रामदादा किरवले यांनी अतिमत्त्वाचा रस्ता सिरसाळा ते आचारी टाकळी मुख्यमंत्री सडक योजनेमध्ये बसविण्यात यावा ही मागणी या समितीवर सदस्य पदी निवड केलेले बाबासाहेब अण्णा काळे यांना करण्यात आली. व यावेळी सत्कार करून त्यांच्या सत्कार करून त्यांना हार्दिक शुभेच्छा व त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यांनी यावेळी जयंती कमिटीचे अध्यक्ष अमोल भैया किरवले आभार मानले.

# महिला सफाई कामगाराचा विनयभंग; आरोपीविरुद्ध 'अ‍ॅट्रॉसिटी'सह गुन्हा दाखल

परळी/प्रतिनिधी

सिरसाळा येथील एका तुळजाभवानी मल्टीस्टेट मध्ये सफाईचे काम करणाऱ्या ३६ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रॉसिटी) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ९:०० ते १०:०० च्या दरम्यान सिरसाळा येथील तुळजाभवानी मल्टीस्टेट बँकेत साफसफाईचे काम करत होती. यावेळी आरोपी सुंदर रामाकांत शिंदे (रा. बोधेगाव, ता. परळी) याने महिलेच्या पाठीमागून येऊन तिच्या खांद्यावर हात ठेवला. तसेच, "तुमचा मोबाईल नंबर द्या" अशी मागणी करून महिलेशी लज्जास्पद वर्तन केले.



फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी हा तिच्या माहेरच्या गावचा असल्याने त्याला तीच्या जातीची पूर्ण कल्पना होती. तरीही त्याने हेतुपुरस्सर तिची छेड काढून विनयभंग केला. या गंभीर प्रकारानंतर पीडित महिलेने सिरसाळा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

पोलिसांनी याप्रकरणी आरोपी सुंदर शिंदे याच्यावर खालील कलमांनुसार गुर नंबर ७३/२०२६ गुन्हा दाखल केला आहे: भा न्या स २०२३: कलम ७४,७५ अ‍ॅट्रॉसिटी कायदा १९८९: कलम ३(१), (२) या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सदर गुन्ह्याचा तपास माजलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी डीवायएसपी शिंदे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

